रे. दि.मु.१६०/२०२० मधील नि.९६ खालील आदेश

(जुना नं. रे. दि.मु. ८२/२००७)

**(*CNR-MHSN15004377-2020*)**

(आनंदा पवार वि. इंदिरा पवार वगैरे ५ )

वादीने सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. ७ यांचे विरुध्द झालेला अबेटमेंटचा हुकूम रद्द करण्याकरीता दाखल केलेला आहे.

(२) वादीचे असे कथन आहे की, वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींविरुध्द साठेखतावरुन खरेदीपत्र होवून मिळणेकरिता दाखल केलेला आहे. दाव्याचे काम चालू असताना दाव्यातील प्रतिवादी क्र. ७ सुशिला मधुकर जाधव ही उचगांव, कोल्हापूर येथे दि. २५/०४/२०१९ रोजी मयत झालेली आहे. प्रतिवादी क्र. ७ सुशिला मधुकर जाधव यांचे सर्व वारस वाटपाचे दाव्याचे कामी जरुरीचे पक्षकार आहेत. परंतु, प्रतिवादी क्र.७ यांच्या मृत्यूबद्दलची माहिती वादी यांना मिळू शकली नाही. तसेच प्रतिवादींनीही प्रतिवादी क्र. ७ ही मयत झालेबाबतची पुरसीस दिलेली नाही. प्रतिवादी क्र. ७ ही उचगांव, कोल्हापुर येथे मयत झालेली असलेने त्याबाबतची माहिती वादीस लवकर मिळु शकली नाही. सदरहू दाव्यातील वादीस कायद्यातील तरतूदीचे पुरेसे ज्ञान नसलेने मयत प्रतिवादीचे वारस दाव्याचे कामी मुदतीत दाखल करणेस तांत्रिकदृष्टया विलंब झाल्याने मयत प्रतिवादीचे विरुध्द सदरचा दावा हा तांत्रिकदृष्टया अबेट झालेला आहे. वादीने असा विलंब जाणुन-बुजून केलेला नव्हता. त्यामुळे प्रतिवादी क्र. ७ यांचे वारस अभिलेखावर घेणेकरिता विलंब झालेने प्रतिवादी क्र. ७ यांचे वारस दाव्याचे कामी रेकॉर्डवर दाखल करुन घेणेत यावेत अशी विनंती केलेली आहे.

(३) प्रतिवादीतर्फे त्याच अर्जावर म्हणणे सादर करुन वादीच्या

अर्जातील सर्व कथने नाकारली आहेत. वादीने जाणिपुर्वक विलंब केला असून अर्ज नामंजूर करणेची विनंती त्यांनी केलेली आहे.

(४) नि. ९६ कडील अर्ज, त्यावरील म्हणणे व त्या पृष्ठयर्थ दाखल केलेले प्रतिज्ञापत्र यांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादीतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादींनी प्रस्तुत अर्जान्वये प्रतिवादी क्र. ७ यांचे वारस अभिलेखावर घेणेस विलंब झालेने प्रतिवादी क्र. ७ यांचे वारस दाव्याचे कामी रेकॉर्डवर दाखल करुन घेणेत यावेत अशी विनंती केलेली आहे. तांत्रिकदृष्ट्या अबेटमेंटचा हुकूम सेटअसाईड करणेत येऊन वारस दाखल करुन घेतल्यास प्रतिवादीचे कसलेही प्रकारचे नुकसान होणार नाही. सदरचा अर्ज विचारात घेता न्याय हिताच्या दृष्टीने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब, अनेक वाद विषय टाळण्याकरीता आणि दावा गुणदोषावर निकाली करण्यासाठी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

०१. अर्ज र. रु. २००/- (र. रु. दोनशे मात्र) खर्चासह मंजूर करण्यात येतो.

Digitally signed by Gaurav Sadashiv Hange
Date: 2021.02.04 17:52:15 +0530

विटा.
दिनांकः-०१.०२.२०२१.

( जी. एस. हांगे )
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, विटा.
जि. सांगली.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Smt. S.P.Patil. |
| Name of the Court | : | Shri. G. S. Hange,<br>2nd Jt. Civil Judge J.D. & J.M.F.C., Vita. |
| Date of Decision | : | 01/02/2021 |
| Order signed by the presiding officer on | : | 04/02/2021 |
| **Order uploaded on** | **:** | **04/02/2021**. |